# जनसंपर्क अधिकारी

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

३२८ - २३ दिनांक : - २१/०९/२०२३

**काशिमिरा पोलीस ठाणेस महिला मदत कक्षाची स्थापना तसेच महिला पोलीस अधिकारी/अंमलदार यांनी मनोरुग्ण महिला वय-२२ वर्ष हिचेवर मनोरुग्णालय ठाणे येथे उपचार करून, तिचे नातेवाईकांचा शोध घेवून तिचेसह अल्पवयीन मुलीस सुखरुप ताब्यात दिले बाबत.**

दि.२१.०९.२०२३ रोजी मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत काशिमिरा पोलीस ठाणेस स्वतंत्र महिला व बाल मदत कक्षाचे मा.पोलीस आयुक्त श्री.मधुकर पांण्डेय यांचे शुभहस्ते मा.श्री.श्रीकांत पाठक अपर पोलीस आयुक्त, जयंत बजबळे पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-०१, मा.श्री.प्रकाश गायकवाड पोलीस उप आयुक्त मुख्यालय, मा.श्री.महेश तरडे सहा.पो.आयुक्त, मिरारोड विभाग यांचे उपस्थितीत नुतणीकरण करण्यात आले आहे. सदर कक्षामार्फत महिला व बालकांसंदर्भात दाखल होणा-या सर्व तक्रारींची दखल घेण्यात येते. मा.पोलीस आयुक्त साो यांचे संकल्पनेतून प्रत्येक शनिवारी तक्रार निवारण दिनाचे औचित्य साधून महिला व बाल मदत कक्षाचे माध्यमातून मनोधैर्य व पुर्नःधैर्य योजनेची परिणामकारक अंमलबजावणी करण्यात येत आहे. तक्रारदारांची समस्या, अडी-अडचणी या बाबत विचारपुस करण्यात येते व योग्य त्या रितीने निपटारा करण्यात येतो. नमुद पथकामध्ये १ महिला अधिकारी, ०२ महिला अंमलदार व २ पुरुष अंमलदार यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचे मार्फत पोलीस ठाणेस आलेले महिला तक्रारदार किंवा महिलांचे अनुषंगाने तक्रार दाखल व तपास करणे तसेच महिलांना सौजन्याने वागणुक देणे व तक्रारींची तातडीने दखल घेतली जाणार आहे. सदर कक्षाचे नुतणीकरण करणेसाठी चाईल्ड हेल्प फाऊंडेशन यांचेही सहकार्य लाभलेले आहे.

तसेच दि.१४.०८.२०२३ रोजी वर नमुद पथकातील नियुक्त मपोउनि./अर्चना जाधव, मपोहवा./स्वाती देठे, समाजीक कार्यकर्ते श्री. परशुराम साळवे, श्रीमती अमी शाह यांनी काशिमिरा पोलीस ठाणे हद्दीत एक महिला-२२ वर्षे ही अल्पवयीन ३ वर्षाचे मुलीसह वेडसरपणे फिरत असतांना मिळून आल्याने तिस ताब्यात घेवून उपचाराकरीता मनोरुग्णालय, ठाणे येथे दाखल करून उपचार केले. तसेच नमुद महिलेचे आधारकार्डवरील नांव व पत्ता नवगांव, आसाम वरून संबंधीत पोलीस ठाणेतील पोलीस अधिकारी यांचेशी संपर्क साधून त्यांचे मदतीने नातेवाईकांचा शोध घेवून तिस व तिचे सोबतचे अल्पवयीन ३ वर्षाचे मुलीस तिचे नातेवाईक (मोठा दिर) यांचे दि.१५.०९.२०२३ रोजी सुखरुप ताब्यात दिले आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त श्री.मधुकर पांण्डेय, मा.श्री.श्रीकांत पाठक अपर पोलीस आयुक्त, मा. श्री. जयंत बजबळे, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-०१, श्री. महेश तरडे, सहा.पो.आयुक्त, मिरारोड विभाग, श्री. संदिप कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, काशिमिरा पोलीस ठाणे यांचा मार्गदर्शनाखाली मपोउनि./अर्चना जाधव, मपोहवा./देठे यांनी केलेली आहे.

---ooo---